मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 31 मे 2026 | पान- 1


# शहरातील अवैध दारूच्या अड्ड्यांवर कठोर कारवाई होणार

## मृत व्यक्तीच्या कुटुंबाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येकी 1 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील विषारी दारू प्रकरणानंतर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी कठोर भूमिका घेतली असून, शहरातील अवैध हातभट्टी व दारू विक्रीच्या अड्ड्यांवर बुलडोझर चालवून ते उद्ध्वस्त करण्याचे निर्देश महापौर रवी लांडगे यांनी दिले आहेत.





विषारी दारूच्या दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची महापौर रवी लांडगे, आमदार उमा खापरे आणि सदाशिव खाडे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी पीडित कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर देण्यात आला

या घटनेतील प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली. तसेच शहरातील अवैध दारू विक्री, हातभट्टी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही महापौरांनी दिला.

शहरातील नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अवैध व्यवसायांना कोणतीही दया दाखवली जाणार नाही. अशा अड्ड्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले.

# अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिकेचा विशेष कार्यक्रम

## 31 मे रोजी विविध सांस्कृतिक व स्मरणात्मक उपक्रमांचे आयोजन; पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याला अभिवादन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीपूर्ती निमित्त “विचार प्रबोधन पर्व” या विशेष उपक्रमाचे आयोजन मोरवाडी चौक, पिंपरी व नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, सांगवी येथे करण्यात आले आहे. रविवार ३१ मे रोजी विविध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या प्रबोधन पर्वाची सुरुवात रविवार ३१ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० मिनिटांनी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे व्यापक कार्य व प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे हे देखील उपस्थित असणार आहेत.

या विचार प्रबोधन पर्वाअंतर्गत रविवार ३१ मे २०२६ रोजी महाराष्ट्राची प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविणारा भव्य सेटवरील ‘सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव’ हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये कोल्हापूर येथील ७५ कलाकार आपल्या सहकाऱ्यांसोबत धनगरीनृत्य, भूपाळी, वासुदेव. पिंगळा, वाघ्या मुरळी, शाहिरी पोवाडे, आदिवासी, डोंबारी अशा विविध व्यक्तीछटा सदर करणार आहेत. या कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्वाभिमानी व आदर्श वाटचालीचे दर्शन घडणार आहे. याशिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील होणार आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचार प्रबोधन पर्वात महापालिकेतर्फे आयोजित करण्यात करण्यात आलेले हे सर्व कार्यक्रम सर्वासाठी खुले तसेच विनामूल्य आहेत. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन त्याग,पराक्रमाचा इतिहास अनुभवावा असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

### कार्यक्रमांचे वेळापत्रक - ३१ मे २०२६

» सकाळी ८.३० वा.- ‘गजनृत्य’ सादरकर्ते – श्री.अंबादास पडळकर व ३० सहकारी
स्थळ – मोरवाडी चौक, पिंपरी

» सकाळी ९.०० वा- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना ढोलपथकाद्वारे अनोखे अभिवादन
सादरकर्ते – सामना ढोलपथक, मुंबई
स्थळ – मोरवाडी चौक, पिंपरी

» सकाळी १०.३० वा. – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते – मा. महापौर
स्थळ – पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत

» सकाळी १०.४५ वा.- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते – मा. महापौर
स्थळ – मोरवाडी चौक, पिंपरी

» सकाळी ११.०० वा. – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन हस्ते – मा. महापौर
स्थळ – सांगवी

» दु. १२.३० वा.-‘सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव’ हा महाराष्ट्राची प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविणारा लोकोत्सव कार्यक्रम (भूपाळी, वासुदेव. पिंगळा, वाघ्या मुरळी, धनगरीनृत्य, शाहिरी पोवाडे, आदिवासी, डोंबारी असे विविध व्यक्तीछटा)
स्थळ – मोरवाडी चौक, पिंपरी

» ७) दु. २.३० वा. – शाहिरी कार्यक्रम
सादरकर्ते – शाहीर श्री. सुरेश जाधव व सहकारी,

# पिंपरी चिंचवड महापालिकेची 250 कोटींच्या मालमत्ता कराची वसुली...

## ऑनलाइन माध्यमातून 230 कोटींहून अधिक कर जमा; दोन लाखांहून अधिक मिळकतधारकांचा प्रतिसाद...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड (दि.२९ मे २०२६) :- पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या प्रारंभी मालमत्ता कर वसुलीत लक्षणीय प्रगती नोंदविली आहे. १ एप्रिल ते २९ मे २०२६ या कालावधीत महापालिकेकडे २५० कोटी ७२ लाख रुपयांहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे.

महापालिकेच्या माहितीनुसार, आतापर्यंत शहरातील २ लाख ४७ हजार ३७१ मिळकतधारकांनी मालमत्ता कर भरला आहे. यामध्ये डिजिटल माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे दिसून आले असून, २ लाख २१ हजार ७६३ नागरिकांनी ऑनलाइन कर भरणा करून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या माध्यमातून २३० कोटी ५७ लाख रुपयांहून अधिक महसूल जमा झाला आहे.



शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. चालू आर्थिक वर्षाची कर देयके संबंधित मालमत्ताधारकांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका उप आयुक्त सचिन पवार यांनी यावेळी सांगितले.

महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक तसेच पर्यावरणपूरक निवासी गृहनिर्माण संस्थांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच ३० जून २०२६ पूर्वी ऑनलाइन कर भरणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असल्याने ऑनलाईन कर भरण्यास नागरिक पसंती देत असल्याचे दिसून येत आहे.

> **मालमत्ता कराच्या वेळेवर होणाऱ्या भरण्यामुळे शहरातील विकासकामांना आर्थिक बळ मिळते. ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद समाधानकारक असून, अद्याप कर न भरलेल्या नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त,**
> **पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> **चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर संकलनाला मिळणारा सकारात्मक प्रतिसाद हा नागरिकांच्या करदायित्वाबाबतच्या सजगतेचे प्रतीक आहे. महापालिकेकडून उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल सुविधांमुळे नागरिकांना घरबसल्या, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने कर भरणे शक्य झाले आहे. ३० जून २०२६ पूर्वी ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी सवलतीचा लाभ उपलब्ध असून, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचा महिना शिल्लक आहे. त्यामुळे नागरिकांनी विलंब न करता डिजिटल सुविधेचा वापर करून वेळेत मालमत्ता कर भरावा.**
>
> **- सचिन पवार, उप आयुक्त,**
> **पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# भोसरी उड्डाणपूल पाडू नका, गावठाणात अतिरिक्त भूसंपादन नको : महापौर रवि लांडगे

## वाहतूक कोंडी, सेवा रस्ते, उड्डाणपूल आणि भोसरी भूसंपादनासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रीय महामार्गांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न, वाढती वाहतूक कोंडी, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्या तसेच शहरातील महत्त्वाच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) चे प्रकल्प संचालक संजय कदम यांच्यासमवेत सविस्तर बैठक घेतली.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध प्रश्नांकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधत त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

बैठकीत पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी, नाशिक फाटा ते खेड उन्नत मार्ग (ELEVATED CORRIDOR) प्रकल्पाची सद्यस्थिती, मुंबई-बंगळुरू महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांचे रुंदीकरण, रस्त्यांची दुरुस्ती, अपघातप्रवण ठिकाणांवरील उपाययोजना, जलनिस्सारण व्यवस्था, पावसाळ्यात महामार्गावर आणि अंडरपासमध्ये साचणारे पाणी, अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



याशिवाय मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग परिसरात प्रस्तावित उड्डाणपूल, अंडरपास दुरुस्ती, सेवा रस्ते बांधणी व रुंदीकरण, वाहतूक सुरळीत करण्यासाठी करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहितीही NHAI अधिकाऱ्यांनी महापौरांना दिली. वाकड, पुनावळे, ताथवडे, रावेत, किवळे तसेच इतर भागांतील वाहतूक आणि पाणी साचण्याच्या समस्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून संबंधित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या.

बैठकीत भोसरी परिसराशी संबंधित दोन अत्यंत महत्त्वाचे विषय महापौर रवि लांडगे यांनी ठामपणे मांडले. भोसरी येथील विद्यमान उड्डाणपूल कोणत्याही परिस्थितीत पाडण्यात येऊ नये तसेच भोसरी गावठाण परिसरात अतिरिक्त भूसंपादन करण्यात येऊ नये, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. विकासकामांच्या नावाखाली स्थानिक नागरिकांना कोणताही अन्याय सहन करावा लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापौरांनी भोसरी गावठाणातील नागरिकांच्या भावना, स्थानिक व्यापारी, रहिवासी आणि वाहतूक व्यवस्थेवर होणारे परिणाम यांचा सविस्तर उल्लेख करत विकास आणि नागरिकहित यामध्ये समतोल राखणे आवश्यक असल्याचे सांगितले. महापौरांच्या सूचनांची दखल घेत NHAI चे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी सर्व विषयांवर सकारात्मक भूमिका घेत आवश्यक त्या कामांना प्राधान्य देण्यात येईल तसेच महापौरांनी मांडलेल्या सूचनांवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, "पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताशी संबंधित कोणत्याही विषयात तडजोड केली जाणार नाही. राष्ट्रीय महामार्गांशी संबंधित प्रश्नांमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करणे, वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आणि विकासकामे वेळेत पूर्ण करणे हे आमचे प्राधान्य आहे. भोसरी उड्डाणपूल आणि गावठाण भूसंपादनाच्या विषयावर नागरिकांच्या भावना सर्वोच्च मानूनच पुढील भूमिका घेतली जाईल. शहराच्या विकासासोबतच नागरिकांचे हक्क आणि हित जपणे ही आमची जबाबदारी आहे."

पिंपरी-चिंचवड शहरातील महामार्ग विकासकामे, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित सर्व प्रश्न मार्गी लागावेत यासाठी महानगरपालिका आणि NHAI यांच्यात सातत्याने समन्वय ठेवण्यात येणार असून, प्रलंबित कामांना गती देण्यासाठी नियमित आढावा बैठका घेण्यात येणार असल्याचेही महापौरांनी यावेळी सांगितले.

# पदपथ अतिक्रमणमुक्तीसाठी महापालिकेची मोठी मोहीम

## 110 कोटींची तरतूद; ‘फुटपाथ क्लिनिंग पथका’द्वारे टपऱ्या व अतिक्रमणांवर थेट कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पदपथांवरील वाढत्या अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांची सुरक्षितता धोक्यात आली असताना महापालिकेने आता कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून विकसितकेलेले फुटपाथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी महापालिकेकडून विशेष ‘फुटपाथ क्लिनिंग पथक’ स्थापन करण्यात येणार आहे. या पथकाच्या माध्यमातून शहरातील पदपथावरील टपऱ्या, फेरीवाले आणि इतर अतिक्रमणांवर थेट कारवाई केली जाणार आहे. पुढील तीन दिवसांत सर्वेक्षण करून शक्य तेवढी अतिक्रमणे हटविण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली

शहरातील पादचाऱ्यांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित करण्यासाठी महापालिकेने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पदपथांची दुरुस्ती, स्वच्छता आणि बेकायदेशीर अतिक्रमणांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पालिकेने तब्बल 110 कोटी रुपयांचे भरीव बजेट मंजूर केले आहे. पदपथांना अतिक्रमणांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी विशेष ‘पदपथ स्वच्छता पथका’ची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

पदपथांवरील बेकायदेशीर टपऱ्या, अनधिकृत फेरीवाले आणि अतिक्रमणे रोखण्यासाठी हे पथक चोख कामगिरी बजावणार आहे. या विशेष पथकात पोलिस कर्मचारी आणि महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांचा संयुक्त समावेश असेल. या पथकाला पालिकेकडून स्वतंत्र वाहने दिली जाणार असून, त्यांना अत्याधुनिक कॅमेरे दिले जाणार आहेत. याद्वारे पदपथांवरील बेकायदेशीर हालचालींवर थेट वॉच ठेवला जाईल, असे राम म्हणाले.

आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, पहिल्या टप्प्यात हे विशेष पथक शहरातील मध्यवर्ती भागातील (सेंट्रल सिटी) सर्व प्रमुख पदपथांचे सविस्तर सर्वेक्षण करेल. पदपथांची नेमकी दुरवस्था काय आहे, कुठे बेकायदेशीर टपऱ्या आहेत आणि कुठे दुरुस्तीची गरज आहे, याचा सविस्तर अहवाल हे पथक प्रशासनाला सादर करेल. या अहवालाच्या आधारे तत्काळ अतिक्रमण हटाव आणि दुरुस्तीची प्रत्यक्ष कारवाई केली जाईल.




### 110 कोटींच्या निधीतून पदपथांचे नूतनीकरण

» पादचाऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ व्हावा यासाठी महापालिकेने पदपथांच्या दुरुस्ती, स्वच्छता आणि देखभालीसाठी तब्बल 110 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शहरातील विविध भागांतील फुटपाथांची स्थिती तपासून आवश्यक दुरुस्ती केली जाणार आहे. तुटलेले, खराब झालेले किंवा अतिक्रमणामुळे वापरात नसलेले पदपथ पुन्हा कार्यक्षम करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार केला जाणार आहे. यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालण्याऐवजी सुरक्षित पदपथांचा वापर करता येईल.

### ‘फुटपाथ क्लिनिंग पथका’ची स्थापना

» पुण्यातील पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेने विशेष ‘फुटपाथ क्लिनिंग पथक’ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या पथकात पोलिस कर्मचारी आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. पथकाला स्वतंत्र वाहने आणि अत्याधुनिक कॅमेरे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. शहरातील पदपथांवर बेकायदेशीरपणे उभारलेल्या टपऱ्या, फेरीवाले आणि इतर अतिक्रमणांवर नियमित कारवाई करून पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे ठेवण्यावर भर दिला जाणार आहे.

### पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

» गेल्या अनेक वर्षांत पदपथांवरील अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे. महापालिकेच्या नव्या मोहिमेमुळे शहरातील पदपथांवरील बेकायदेशीर अतिक्रमणांना आळा बसण्याची अपेक्षा आहे. प्रथम टप्प्यात मध्यवर्ती शहरातील पदपथांचे सर्वेक्षण करून अहवाल तयार केला जाणार असून त्यानंतर अतिक्रमण हटविणे आणि दुरुस्तीची कामे हाती घेतली जातील. त्यामुळे पुणेकरांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त पदपथ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

---

# नफ्याच्या हव्यासापोटी 18 जणांचा बळी; विषारी दारू प्रकरणात धक्कादायक माहिती समोर

## गेल्या दोन दिवसांपासून या प्रकरणाची राज्यभरात चर्चा असून, आता या प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारू प्रकरणात मृतांचा आकडा आता १८ वर पोहोचला आहे. अवघ्या दोन दिवसांत फुगेवाडी-दापोडी परिसरात १२ तर हडपसरमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला असून अनेकांवर उपचार सुरू आहेत. फुगेवाडीतील सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याने चिंतेचे वातावरण आहे. या घटनेमुळे १८ जणांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून या प्रकरणाची राज्यभरात चर्चा असून, आता या प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. अधिक नफा कमावण्यासाठी आरोपी योगेश वानखेडे याने दारूमध्ये मिथेनॉल हे घातक रसायन मिसळत असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

योगेश वानखेडे हा एक व्यावसायिक दारू तस्कर आणि अवैध विक्रेता आहे. या प्रकरणात पहिली अटक त्याची झाली होती. त्यानंतर इतर आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्याच्या विरोधात दारू तस्करीशी संबंधित तीन गुन्हे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये आधीच दाखल करण्यात आले आहेत. पोलीस सध्या या प्रकरणाच्या साखळीचा तपास करत असून, या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता आहे

दरम्यान, या प्रकरणाचा तपास आता गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनीही कठोर पावले उचलत हडपसर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मोगले, एपीआय सिकलगर आणि पोलीस उपनिरीक्षक मुलानी यांना निलंबित केले आहे.

या प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी चार जणांना ८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तपास यंत्रणा संपूर्ण पुरवठा साखळीचा शोध घेत असून आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### अधिक नफ्याचा हव्यास

» उरळी कांचन येथील देशी दारूची भट्टी चालवणारा राधेश्याम प्रजापती याच्याकडून योगेश वानखेडे ३५ लिटरचा एक कॅन १,९०० रुपयांना खरेदी करत होता. त्यानंतर ही दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध दारू गुत्त्यांवर २,७०० रुपयांना विकली जात होती. मात्र, दारूचे प्रमाण वाढवून अधिक नफा मिळवण्यासाठी ऑनलाईन मागवलेले मिथेनॉल त्यात मिसळले जात होते. या घातक मिश्रणामुळे अनेक निष्पाप नागरिकांचा जीव गेला असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

# विधान परिषदेसाठी महाविकास आघाडीकडून श्रीकांत पाटील यांना उमेदवारी

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष आणि माजी नगरसेवक श्रीकांत पाटील यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषदेच्या जागेसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष, माजी नगरसेवक श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा उमेदवार कोण असणार आणि भाजप उमेदवार उभा करणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजप या महायुतीतील मित्रपक्षांकडून दावा करण्यात येत असताना महाविकास आघाडीने श्रीकांत पाटील यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे महायुतीचा उमेदवार कोण असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. श्रीकांत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष आहेत.

त्यांनी बोपोडी भागातून नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांचे वडील वि. भा. पाटील हे १९६९ मध्ये पुण्याचे महापौर होते. तसेच १९७७ मध्ये ते पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. आता श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

या मतदार संघात ८६७ मते आहेत. त्यामध्ये पुणे महापालिकेतील १६५ नगरसेवक आणि १० स्वीकृत नगरसेवक, जिल्हा परिषदेत निवडून आलेले ७३ सदस्य आणि १३ नियुक्त केलेले सदस्य आहेत.

नगर परिषद आणि नगरपंचायतींमध्ये सर्वाधिक ४३२ निवडून आलेले सदस्य आणि ४३ नियुक्त केलेले सदस्य आहेत. पुणे, देहूरोड आणि खडकी कॅन्टान्मेंट बोर्डात प्रत्येकी एक नियुक्त सदस्य आहे. त्यांपैकी 'राष्ट्रवादी'ने त्यांच्याकडे ३७० मते असल्याचा, तर भाजपने ३३३ मते खात्रीची असल्याचा दावा केला आहे.

'या मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसकडून इच्छुक होतो. मात्र, पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आता त्यांनी उमेदवारी मागे घेऊ नये,' असे काँग्रेसचे राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी सांगितले.



### ८६७ मतदार ठरवणार विजेता

**» पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात एकूण ८६७ मतदार आहेत. यामध्ये महापालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपंचायत आणि कॅन्टोनमेंट बोर्डातील सदस्यांचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधी मतदान करत असल्याने या निवडणुकीत पक्षनिष्ठा आणि स्थानिक राजकीय समीकरणांना विशेष महत्त्व असते. महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता महायुतीचा अंतिम निर्णय आणि त्यानंतरची निवडणूक रणनीती याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

### कोण आहेत श्रीकांत पाटील?

**» श्रीकांत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पुणे शहराध्यक्ष असून त्यांनी बोपोडी परिसरातून नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामाचा मोठा अनुभव आहे. त्यांचे वडील वि. भा. पाटील यांनी १९६९ मध्ये पुण्याचे महापौर म्हणून तर १९७७ मध्ये पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे आमदार म्हणून काम पाहिले होते. या राजकीय वारशासह स्थानिक पातळीवरील सक्रिय कामामुळे श्रीकांत पाटील यांच्या उमेदवारीला महत्त्व प्राप्त झाले आहे.**

### महायुतीत उमेदवारीवरून उत्सुकता

**» या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजप या दोन्ही मित्रपक्षांनी दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर केल्यानंतर महायुतीचा अधिकृत उमेदवार कोण असेल, याबाबत राजकीय चर्चांना वेग आला आहे. राष्ट्रवादीकडे ३७० मते असल्याचा दावा केला जात असताना भाजपने ३३३ मते आपल्या बाजूने असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आगामी निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

# एनडीए 150 वा दीक्षांत समारंभ; खडकवासला येथे 353 कॅडेटचे भव्य संचलन

## लष्कर, नौदल आणि वायुदलात प्रवेशासाठी कॅडेट रवाना; जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी घेतली मानवंदना

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या खडकवासला येथील क्षेत्रपाल मैदानावर शनिवारी १५० व्या तुकडीचा दीक्षांत संचालन समारंभ जल्लोषात पार पडला. यावेळी एकूण ३५३ कॅडेटने तीन वर्षांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करत एनडीएच्या बँडच्या सुमधुर धून मध्ये "कदम कदम बढाया जा" म्हणत अंतिम पथच्या दिशेने वाटचाल केली.

कॅडेट मयांक चौधरी याने यावर्षी संचालनाचे नेतृत्व केले. संचलनात एकूण १२५० कॅडेट सहभागी झाले होते.चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल उपेंद्र दिवेदी यांनी संचलनाची पाहणी करत विविध स्कॉडनची मानवंदना स्वीकारली. तीन चेतक हेलिकॉप्टर, सुपर डिमेनो विमान आणि सुखोई विमानांनी संचलन मैदानावरून उड्डाण करत मानवंदना दिल

यंदा उत्तीर्ण झालेल्या ३५३ कॅडेट मधील २९२ जण लष्करात, ४३ जण नौदलात तर ८१ जण वायुदल मध्ये पुढील एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना होणार आहे. यात 18 मुली भारतीय सैन्यदलात अधिकारी पदावर गेल्या.भारताच्या मित्रदेशाच्या एकूण २४ कॅडेट ने देखील यावर्षी एनडीए मध्ये यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे. कॅडेट रोहित काजला यास सुवर्ण पदक, कॅडेट पीयुष रौतला यास रौप्य पदक तर कॅडेट साहिल शर्मा यास कांस्य पदक मिळाले. तसेच चीफ ऑफ आर्मी स्टाफ बॅनर हा मानाचा पुरस्कार चार्ली स्कॉडन यांना प्राप्त झाला.

याप्रसंगी चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल उपेंद्र दिवेदी, लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल संदीप जैन, एनडीएचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी,डेप्युटी कमांडंट एअर व्हाइस मार्शल राजेश वर्मा उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र दिवेदी म्हणाले, ४२ वर्षांपूर्वी मी एनडीए मधून प्रशिक्षण पूर्ण केले आणि आज याठिकाणी उपस्थित आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.१२ मित्रदेशातील २४ कॅडेट आज प्रशिक्षण पूर्ण करतात ही इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचे दृष्टीने महत्वपूर्ण गोष्ट आहे.



### ऑपरेशन सिंदूरने निर्माण केला आदर्श...

**» ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आपण एखाद्या हल्ल्याला कशाप्रकारे खंबीरपणे प्रत्युत्तर देतो याचे प्रतीक आहे. कॅडेटने कौशल्य, सामर्थ्य, अनुकूलनक्षमता आणि सर्वांगीण दृष्टिकोन हे गुण बाळगणे आवश्यक आहे.महिला कॅडेट या देखील खडतर प्रशिक्षण पूर्ण करत असून त्यांना देखील पुरुष कॅडेट इतकाच समान दर्जा आहे. युद्ध क्षेत्रात महिला देखील आता नेतृत्व करण्यात मागे नाही ही आपल्यादृष्टीने कौतुकास्पद बाब आहे.**